महाराष्ट्र शासन
शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई)

शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी, वृत्त शाखा, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दूरध्वनी क्रमांक-०२२-२२८२१५६६

शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त "गट ब" अधिकारी यांचेकडून करार पध्दतीने १ वर्ष कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात **प्रशासकीय व लेखाविषयक क्षेत्रातील** विवक्षित कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

विवक्षित कामाचे स्वरुप, अर्ज, नमुना, अटी शर्ती व याबाबतची माहिती dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

*शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १० जून २०२५ नुसार नियुक्तीनंतर आर्थिक लाभ देण्यात येतील.

* इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता, प्रशासकीय अनुभवाच्या प्रमाणपत्रासह जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून **दिनांक १९ नोव्हेंबर, २०२६** रोजी **संध्याकाळी ५.०० वा.** पर्यंत मा.महासंचालक यांच्या नावे उपरोक्त नमूद पत्त्यावर सादर करावेत.

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष,
शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी तथा
महासंचालक
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई

शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी
शासकीय/निमशासकीय गट ब (राजपत्रित) सेवानिवृत्त अधिकारी यांची सेवा करारपध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :

२) अर्जदाराचा पत्ता :

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :

४) भ्रमणध्वनी क्रमांक :

५) जन्म दिनांक व वय :

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? होय/नाही

७) अनुभव :----------

---------- जाहिरात /सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील / सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक :

(उमेदवाराची स्वाक्षरी)

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

गट-ब संवर्गातील सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी, वृत्त शाखा, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दूरध्वनी क्रमांक-०२२-२२८२१५६६

शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त "गट ब" अधिकारी यांचेकडून करार पध्दतीने १ वर्ष कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील **प्रशासकीय व लेखाविषयक क्षेत्रातील** विवक्षित कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

१. सदर नियुक्ती केवळ १२ महिन्यांच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. सीबीई-१५२५/प्र.क.३७/आस्थामं, (का.१३), दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.
२. शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी, वृत्त शाखा येथे नियुक्ती करण्यासाठी भरावयाची पद, पात्रता, कामकाजाचे स्वरुप व अनुभव या बाबतचा तपशील खालील प्रमाणे :-

अ.क्र.	विवक्षित सेवा/कामाचे स्वरुप :	वय, अर्हता व अनुभव	पदसंख्या
१	शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी, (पत्रकार कल्याण निधी तसेच आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना यांच्याशी संबंधीत प्रशासकीय व लेखाविषयक कामकाज पाहणे.	प्रशासकीय,लेखाविषयक,व संगणकीय कामकाजाचे ज्ञान तसेच रोखपाल वा समकक्ष म्हणून शासन सेवेतील किमान ५ वर्षाचा अनुभव, वयोमर्यादा ५८ ते ६२ वर्षापर्यंत.	१

३. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.
४. उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.
५. उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा
६. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.
७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र/आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.
८. आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.अर्जाचा नमूना महासंचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
९. उमेदवाराने त्यांचे अर्ज सदर पदाकरिता संकेतस्थळ वरील माहिती पाहून dgipr.maharashtra.gov.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक १९ नोव्हेंबर, २०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वा. पर्यंत सादर करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी दूरध्वनीवर क्र. ०२२-२२८२१५६६ संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

१०. विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही, तसेच अशा अर्जाना उत्तर देण्यात येणार नाही.
११. मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचा राहील.
१२. करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस **शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी, वृत्त शाखा, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२** येथे काम करावे लागेल.
१३. इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. क्र. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.
१४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६ नुसार नियुक्तीनंतर आर्थिक लाभ देण्यात येतील.

* इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी / कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता, प्रशासकीय अनुभवाच्या प्रमाणपत्रासह अध्यक्ष, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी तथा मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळ मजला, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे उपरोक्त नमूद पत्त्यावर **दिनांक १९ नोव्हेंबर, २०२६** रोजी **संध्याकाळी ५.०० वा.** पर्यंत सादर करावेत.

संपर्क :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, वृत्त शाखा, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक-०२२-२२८२१५६६